राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत सन २०२६-२७ साठी तिन्ही प्रवर्गाचा (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) पहिल्या हप्त्याचा निधी (केंद्र व राज्य हिस्सा) वितरित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अपोसु-२०२६/प्र.क्र.४६/४-अे-(ई-१६३८९०१)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ मे, २०२६

**वाचा:**

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१९/०४/२०१७ .
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१२/०९/२०१७.
३. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, दि.०४/११/२०२०.
४. शासन पत्र No.CSS-२०२६/C.R.१९/२-A, दि.११/०३/२०२६.
५. केंद्र शासनाचे पत्र F.No.०३/१४/२०२६-KY (E-१८६५५७), दि.२२/०४/२०२६.
६. केंद्र शासनाचे पत्र F.No.(MH-१०), दि.२३/०४/२०२६.
७. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. अपोसु-२०२६/प्र.क्र.४६/४-अे-(ई-१६३८९०१), दि.११/०५/२०२६.
८. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०७/०५/२०२६.
९. आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दि.१३/०५/२०२६.
१०. सामाजिक न्याय विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/ अर्थसंकल्प, दि.१९/०५/२०२६.
११. कृषि आयुक्तालयाचे जाक्रकृआ/विप्र-१/राअसुपोअ/नि.वि. २०२६-२७ भाग-१/प्र.क्र.०७/र-३१/२०२६. दि.११/०५/२०२६.

**प्रस्तावना:**

राज्यातील अन्नधान्य उत्पादनात वाढ करणे, शेतीची उत्पादकता व शाश्वतता सुनिश्चित करणे, तसेच, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, या उद्देशाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान (NFSNM) अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानामार्फत तांदूळ, गहू, भरडधान्ये, पौष्टिक तृणधान्ये व इतर पिकांच्या उत्पादनवाढीसाठी क्षेत्रवाढ, सुधारित बियाण्यांचा वापर, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब व मृदा आरोग्य सुधारणा यांवर विशेष भर दिला जातो. यामुळे देशाची अन्न सुरक्षा मजबूत होऊन शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साध्य होण्यास मदत होते.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान या योजनेचा सन २०२६-२७ करिता रु. १८५५२.५० लाख (अक्षरी एकशे पंच्याऐंशी कोटी, बावन्न लाख, पन्नास हजार रुपये फक्त ) (केंद्र हिस्सा रु. १११३१.५० लाख व राज्य हिस्सा रु. ७४२१.०० लाख) निधीचा वार्षिक कृती आराखडयास वाचा क्र.४ नुसार, राज्यस्तरीय मंजुरी समितीने (SLSC)

दि. ११.०३.२०२६ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सदर वार्षिक कृती आराखडयास केंद्र शासनाने वाचा क्र.५, दि. २२.०४.२०२६ अन्वये, सन २०२६-२७ करिता प्रलंबित दायित्व रु. ४६.०० कोटीसह, केंद्र व राज्य हिश्श्यासह एकूण रु. २३१५२.५० लाख (अक्षरी दोनशे एकतीस कोटी, बावन्न लाख, पन्नास हजार रुपये फक्त) निधीच्या वार्षिक कृती आराखड्यास मंजूरी दिलेली आहे. राज्यस्तरीय मंजुरी समितीने (SLSC) व केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार, सदर अभियानास वाचा क्र.७, दि.११/०५/२०२६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२६-२७ साठी, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत केंद्र शासनाने तिन्ही प्रवर्गांकरिता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) पहिल्या हप्त्यापोटी, केंद्र हिश्श्याचा एकूण रु. ५५५६.६० लाख निधी वाचा क्र.६, दि.२३/०४/२०२६ अन्वये वितरीत केलेला आहे. त्याअनुषंगाने, कृषि आयुक्तालयाच्या मागणीप्रमाणे, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत प्राप्त झालेला, केंद्र हिश्श्याचा रु.५५५६.६० लाख व त्यास समरुप राज्य हिश्श्याचा रु.३७०४.४० लाख असा एकूण रु.९२६१.०० लाख निधीस, वित्तीय मान्यता प्रदान करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:**

सन २०२६-२७ साठी, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत तिन्ही प्रवर्गांसाठी एकूण रु. ९२६१.०० लाख (अक्षरी रु.ब्याण्णव कोटी एकसष्ट लाख रुपये फक्त ) (प्रलंबित दायित्वासह) (केंद्र हिस्सा रु.५५५६.६० लाख व त्यास समरुप राज्य हिस्सा रु. ३७०४.४० लाख) निधीस वित्तीय मान्यता देवून, या शासन निर्णयान्वये, आयुक्त (कृषी) पुणे, यांना सदर निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर निधीपैकी केंद्र व राज्य हिश्श्याच्या वितरीत निधीचे प्रवर्गनिहाय विवरण पुढीलप्रमाणे :-

**(रू.लाखात)**

| प्रवर्ग | लेखाशिर्ष | केंद्रराज्य/ | रुलाखात . |
|---|---|---|---|
| सर्वसाधारण | २४०१४६१४ | केंद्र हिस्सा | ४३७८.६०००० |
| | २४०१A२३४ | समरुप राज्य हिस्सा | २९१९.०६६६७ |
| | -- | **एकुण** | **७२९७.६६६६७** |
| अनुजाती . | २४०१B१०५ | केंद्र हिस्सा | ६५५.६८००० |
| | २४०१B११४ | समरूप राज्य हिस्सा | ४३७.१२००० |
| | -- | **एकुण** | **१०९२.८००००** |
| अनुज .माती | २४०१A५५७ | केंद्र हिस्सा | ५२२.३२००० |
| | २४०१A५६६ | समरूप राज्य हिस्सा | ३४८.२१३३३ |
| | -- | **एकुण** | **८७०.५३३३३** |
| एकूण | -- | **केंद्र हिस्सा** | **५५५६.६००००** |
| | -- | **समरूप राज्य हिस्सा** | **३७०४.४००००** |
| | -- | **एकुण** | **९२६१.०००००** |

३. सदर अभियानातंर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेला केंद्र हिश्श्याचा रु.५५५६.६० लाख व राज्य हिश्श्याचा रु. ३७०४.४०लाख निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून SNA-SPARSH खात्यातून खर्ची टाकावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|
| **सर्वसाधारण** | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००) (१०२) अन्नधान्य पिके<br>(००) (२५) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके<br>(केंद्र हिस्सा ६०%) (२४०१ ४६१४)<br>(योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००) (१०२) अन्नधान्य पिके<br>(००) (३३) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (राज्य हिस्सा ४०%) (२४०१ A२३४)<br>(योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जाती** | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००)(७८९) अनुसूचीत जाती उपयोजना<br>(००) (०५) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके<br>(केंद्र हिस्सा ६०%) अनुसूचित जाती उपयोजना (२४०१ B१०५),<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००)(७८९) अनुसूचीत जाती उपयोजना<br>(००)(०६) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (राज्य हिस्सा ४०%) अनुसूचित जाती उपयोजना (२४०१ B११४),<br>३३, अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१- पीक संवर्धन,<br>७९६-जनजाती क्षेत्रांतर्गत उपयोजना (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना),<br>जनजाती क्षेत्राअंतर्गत उपयोजना,<br>(०१) (२१) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके<br>(केंद्र हिस्सा ६०%) (२४०१ A५५७)<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१- पीक संवर्धन,<br>७९६-जनजाती क्षेत्रांतर्गत उपयोजना (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना),<br>जनजाती क्षेत्राअंतर्गत उपयोजना,<br>(०१)(२२) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (राज्य हिस्सा ४०%) (२४०१ A५६६)<br>३३, अर्थसहाय्य |

४. सन २०२६-२७ मध्ये राज्यात सदर अभियानाची अमंलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने निधी आहरण व वितरण करणेसाठी, पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

| स्तर | नियंत्रण अधिकारी | आहरण व संवितरण आधिकारी |
|---|---|---|
| आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि),<br>कृषी आयुक्तालय, पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे. |

५. सदर योजनेची अंमलबजावणी करताना उपरोक्त वाचा क्र.७, दि.११/०५/२०२६ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात यावी.

६. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा. तसेच, निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०७/०५/२०२६ आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/ कार्यासन-६,दि.१३/०५/२०२६

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९/०५/२०२६ नुसार विहीत केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने, तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५२११८४०३२४८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RUCHITA RANJAN PIMPLE

Digitally signed by RUCHITA RANJAN PIMPLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=4D2E14E1B5B622285A319D549438716BC45686280AAC03BEA60829E714C19298, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E83BB07DDF0C67032F513E6336E3EE49F53DC047998C7012096DD9C8059D5FE, cn=RUCHITA RANJAN PIMPLE
Date: 2026.05.21 18:41:35 +05'30'

**( रुचिता पिंपळे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मंत्री(कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
११) महालेखाकार ( स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा), मुंबई
१२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१४) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
१५) सर्व कृषी विदयापीठे ( पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला, डॉ.बाळासाहेब सांवत कृषि विदयापीठ दापोली, वसंतराव नाईक कृषी विदयापीठ, परभणी व महात्मा फुले कृषी विदयापीठ राहूरी )
१६) सर्व कृषि विज्ञान केंद्रे
१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२०) सर्व तालुका कृषि अधिकारी.
२१) सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
२२) वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२३) निवड नस्ती.